मराठवाडा विकास कार्यक्रमांतर्गत मत्स्यव्यवसाय
विकासाच्या योजनांची अंमलबजावणी करणेबाबत.

# महाराष्ट्र शासन

कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग,
शासन निर्णय क्रमांकः मत्स्यवि २४०८/प्र .क्र.१४२/पदुम-१३,
मंत्रालय विस्तार, मुंबई ४०००३२
दिनांक १५ सप्टेंबर, २००८.

वाचा :- शासन निर्णय कृषी व पदुम विभाग, क्रमांकः मत्स्यवि २४०७/
प्र.क १९२/पदुम-१३ दि.१५.१.२००८

**<u>शासन निर्णय :-</u>**

राज्यातील इतर भागासमवेत मराठवाडयाचा देखिल विकास होण्याच्या दृष्टिने मराठवाडयातील कृषी संलग्न क्षेत्राचा विकास दर ६ टक्के नेण्याचे उद्दिष्ठ ११ व्या पंचवार्षिक योजनेत ठरविण्यात आालेले आहे. हे उद्दिष्ट गाठण्यासाठी मत्स्यव्यवसाय विकासासाठी मत्स्यबीज केंद्राचे बळकटीकरण, मत्स्यबीज संचयन, झिंगाबीज संचयन, मत्स्यव्यवसाय संस्थांचे बळकटीकरण, मत्स्यव्यवसाय सहकारी संस्थेच्या सभासदांना वाहतूक सुविधा उपलब्ध करुन देणे आदि योजना- राबविण्यासाठी संदर्भाधीन शासन निर्णय दि. १५.१.२००८ अन्वये मान्यता देण्यात आली आहे. सदर योजना सन २००८-०९ व २००९-१० या दोन आर्थिक वर्षात राबविण्यात येणार आहे. सन २००८-०९ साठी एकूण रू. ६१६.०० लक्ष तरतूद पुरवणी मागणीद्वारे मंजूर करण्यात आली असून रू. ८४ लक्ष अर्थसंकल्पीत करण्यात आालेली आहे. सदर एकूण रू. ७०० लक्षच्या तरतूदीमधून खाली नमूद केल्यानुसार खर्च करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

१) **<u>मत्स्यबीज केंद्राचे बळकटीकरण :-</u>** मराठवाडा विभागातील ६ मत्स्यबीज केंद्राचे बळकटीकरण करणे आवश्यक असून या केंद्रातील संचयन व संवर्धन, तलावांची दुरूस्ती, गाळ काढणे, पाईप लाईन दुरूस्ती, वर्तुळाकार हॅचरीची दुरूस्ती इ. कामांसाठी एकूण रू. ८४.०० लक्ष इतक्या रकमेची तरतूद करण्यात आली आहे. सदर बांधकाम सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत करण्यात येणार असून यासाठी होणारा खर्च सार्वजनिक बांधकाम विभागाच्या लेखशिर्ष मागणी क्र.एच-८, ४४०५- मत्स्यव्यवसायावरील भांडवल खर्च, १०१ केंद्र भुजल मत्स्यव्यवसाय (दोन) (एक) मत्स्यबीज क्षेत्र मोठी/लहान बांधकामे (४४०५ ००१४१) खाली सन २००८-०९ मध्ये उपलब्ध असलेल्या तरतूदीमधून भागविण्यात यावा.

२) **मत्स्यबीज संचयन :-** मराठवाडा विभागातील उपलब्ध जलक्षेत्रात इष्टतम मत्स्यबीज संचय-नासाठी एकूण इष्टतम मत्स्यबीज संचयनापैकी प्रथम ५०% संचयन मत्स्य विभागामार्फत करण्याचे प्रस्तावित असून यासाठी रुपये ७५ लक्ष तरतूद करण्यात आली आहे. सदरचा खर्च लेखाशिर्ष २४०५ - मत्स्यव्यवसाय १०१ भूजल मत्स्यव्यवसाय (०२) (०२) अवरूद्ध पाण्यात मत्स्यसंवर्धन, राज्य योजनांतर्गत योजना, २१ सामुग्री व पुरवठा (२४०५ ०१३७) खाली मंजूर तरतूदीमधून करण्यात यावा.

३) **झिंगाबीज संचयन :-** गोडया पाण्यातील झिंग्यास जास्त मागणी व जास्त दर मिळत असल्याने झिंगा उत्पादनास चालना देण्यासाठी रू ४००.०० लक्ष इतकी तरतूद करण्यात आली आहे. सदरचा खर्च लेखाशिर्ष मागणी क्र.डी-६ २४०५-मत्स्यव्यवसाय १०१ भूजल मत्स्यव्यवसाय (०२) (०२) अवरूद्ध पाण्यात मत्स्यसंवर्धन योजनांतर्गत योजना, २१ सामुग्री व पुरवठा (२४०५ ०१३७) खाली मंजूर तरतूदीमधून करण्यात यावा.

४) **मत्स्यव्यवसाय संस्थांचे बळकटीकरण :-** मराठावाडा विभागातील मत्स्यव्यवसाय सहकारी मासळी खरेदी, विक्री व वाहतूक इ.साठी भाग भांडवल देण्याचे प्रस्तावित असून यासाठी रू ८०.०० लक्ष करण्यात आली आहे. सदरचा खर्च लेखाशिर्ष मागणी क्र.डी-१०, ४४०५-मत्स्यव्यवसायावरील भांडवली खर्च (००) (१९१) मत्स्यव्यवसायिक सहकारी संस्था-पंचवार्षिक योजनांतर्गत योजना- (०१) (०१) व्यवस्थापकीय सहाय्य राज्य योजनांतर्गत योजना ३३- अर्थसहाय्य (४४०५ ०१२१) खाली मंजूर तरतूदीमधून करण्यात यावा.

५) **मत्स्यव्यवसाय सहकारी संस्थेच्या सभासदांना वाहतूक सुविधा :-** मत्स्यव्यवसाय सहकारी संस्थेच्या सभासदांनी पकडलेली मासळी त्वरीत जवळच्या बाजारात विक्रीसाठी नेणे व संस्करण केंद्रावर पोहचविण्यासाठी संस्थेच्या क्रियाशील मच्छिमारांना सायकली व शीतपेटया देण्याचे प्रस्तावित असून त्यासाठी रू ६१.०० लक्ष इतकी तरतूद करण्यात आली आहे. सदरचा खर्च लेखाशिर्ष मागणी क्र.डी-६, २४०५-मत्स्यव्यवसाय, १२० मत्स्यव्यवसाय सहकारी संस्था (०२) (०४) मासळीचे सुरक्षण, वहातूक व विक्री, ३३ अर्थसहाय्य (२४०५ ०३७१) खाली खर्ची टाकण्यात यावा.

या कार्यक्रमांची प्रभावीपणे अमंलबजावणी करण्यासाठी खालील प्रमाणे समित्या नियक्त करण्यात येत आहेत.

१) खरेदी समिती :- मराठवाडा विकास कार्यक्रमांतर्गत खरेदी करावयाच्या साहित्यासाठी पुढीलप्रमाणे खरेदी समिती राहिल.

| | | |
|---|---|---|
| १ | आयुक्त मत्स्यव्यवसाय, महाराष्ट्र राज्य, मुंबई | अध्यक्ष |

| | | |
|---|---|---|
| २ | उपसचिव (मत्स्य), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय | सदस्य |
| ३ | मत्स्यव्यवसास उपसंचालक (भजल), आयुक्त कार्यालय | सदस्य |
| ४ | प्रादेशिक उपआयुक्त मत्स्यव्यवसाय, औरंगाबाद | सदस्य |
| ५ | सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय, औरंगाबाद | सदस्य |
| ६ | लेखा अधिकारी, आयुक्त कार्यालय | सदस्य |
| ७ | सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय ( मत्स्यबीज) | सदस्य सचिव |

सदरचा समिती शासन निर्णय. कृषि व पदुम विभाग क्र. मत्स्यवि २४०३/प्र.क्र. १८३/ पदुम -१३, दिनांक २८.६.२००५ अन्वये विहित करण्यात आलेल्या कार्यपध्दतीनुसार मराठवाडा विकास पॅकेज योजनेंतर्गत खरेदी करावयाच्या साहित्याबाबत निर्णय घेईल.

२. **संनियंत्रण समिती :-** योजना राबविताना त्याचे संनियंत्रण करण्यासाठी खालीलप्रमाणे समिती राहील.

| | | |
|---|---|---|
| १ | प्रादेशिक मत्स्यव्यवसाय उपआयुक्त, औरंगाबाद | अध्यक्ष |
| २ | उपनिबंधक, सहकारी संस्था, (मत्स्य) आयुक्त कार्यालय | सदस्य |
| ३ | सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय, संबंधित जिल्हा | सदस्य |
| ४ | मत्स्यव्यवसाय विकास अधिकारी, प्रादेशिक कार्यालय, औरंगाबाद | सदस्य सचिव |

ही समिती जिल्हास्तरावरील नियुक्त केलेली समिती कार्यक्रमाची अमंलबजावणी योग्य रितीने करते किंवा नाही यावर देखरेख व नियंत्रण ठेवील.

३. **अंमलबजावणी समिती :-** मराठवाडा विकास कार्यक्रमांतर्गत योजनांची अंमलबजावणी करण्यासाठी जिल्हा स्तरावर पुढीलप्रमाणे अमंलबजावणी समिती राहिल.

| | | |
|---|---|---|
| १ | सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय, संबंधित जिल्हा | अध्यक्ष |
| २ | सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था (मत्स्य) संबंधित जिल्हा | सदस्य |
| ३ | कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग किंवा त्यांचा प्रतिनिधी (संबंधित जिल्हा ) | सदस्य |
| ४ | मत्स्यव्यवसाय विकास अधिकारी (संबंधित जिल्हा ) | सदस्य सचिव |

सदर समिती योजनेच्या अंमलबजावणीबाबत निर्णय घेऊन त्याप्रमाणे कार्यवाही करेल.
१) या विशेष पॅकेज अंतर्गत शासकीय मत्स्यबीज केंद्रामधील मत्स्यबीज झिंगाबीज संचयन करण्यात यावे व उर्वरित खरेदी वरील खरेदी संमितीमार्फत करण्यात यावी.

२) सायकल/शितपेटया खरेदीची कार्यवाही रेट कॉन्ट्रक्टवर अथवा विविध पध्दतीने नियमानुसार खरेदी समितीमार्फत करण्यात यावी.

३) संनियंत्रण समिती, मत्स्यव्यवसाय संस्थांच्या बळकटीकरण योजनेंतर्गत भागभांडवल पुरविण्यासाठी लाभार्थी संस्था निवडींसाठी आवयकते निकष ठरवून देईल.

४) मत्स्यबीज केंद्राचे बळकटीकरण या योजनेंतर्गत सार्वजनिक बांधकाम विभाग मराठवाडा विभागाचा अधिक्षक अभियंता/कार्यकारी अभियंता यांचोशी समन्वय साधून अर्थसंकल्पित निधी अंदाजपत्रकानुसार खर्च करण्यात यावा.

वरील सनियंत्रण समिती व अमंजबजावणी समितीवर नियंत्रण व समितीच्या कार्यकक्षा निश्चितीचे अधिकार आयुक्त मत्स्यव्यवसाय यांचे राहतील.

या विशेष पॅकेजअंतर्गत कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्यासाठी पर्यवेक्षक अधिकारी म्हणून प्रादेशिक उपआयुक्त मत्स्यव्यवसाय औरंगाबाद हे राहतील व नियंत्रण अधिकारी म्हणून आयुक्त मत्स्यव्यवसाय महाराष्ट्र राज्य मुंबई, हे राहतील. या कार्यक्रमाची अंमलबजावणी करताना अनुदान वाटप व्यवस्थितपणे करण्याची तसेच उपलब्ध निधीच्या मर्यादेत पूर्ण खर्च करण्याची जबाबदारी आयुक्त मत्स्यव्यवसाय कार्यालयाची राहील, त्यानी मंजूर निधीतून प्रत्यक्षात खर्च केल्याची बाबनिहाय एकत्रित माहिती कृषी व पदुम विभाग आणि वित्त विभागास पाठवावी.

हे आदेश वित्त विभागाचे परिपत्रक क्र. पूरक१०.०८ / प्र.क्र. १९२ / अर्थसंकल्प ३, दि. ५ ऑगस्ट, २००८ मधील सुचनांनुसार निर्गमित करण्यात येत आहेत.

मराठवाडा विकास पॅकज संदर्भात यापूर्वी निर्गमित करण्यात आलेला शासन निर्णय क्र.मत्स्यवि २४०८/प्र.क १४२/पदुम-१३ , दि.९.९.२००८ या शासन निर्णयान्वये रद्द करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या वेबासाईट (www.maharashtra.gov.in) उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २००८०९१५१७३९११००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

( म.ह.सोनकुसरे )
उपसचिव, महाराष्ट्र शासन,
कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग

प्रति,

मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
मा.उपमुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
मा.मंत्री (पदुम) यांचे खाजगी सचिव
आयुक्त, मत्स्यव्यवसाय, महाराष्ट्र राज्य, मुंबई (५ प्रती)
प्रादेशिक उपायुक्त मत्स्यव्यवसाय, औरंगाबाद,
विभागीय आयुक्त, औरंगाबाद, लातूर
मुख्य कार्यकारी अधिकारी, मत्स्यसंवर्धन विकास यंत्रणा, औरंगाबाद, जालना, बीड, परभणी, हिंगोली, नांदेड, उस्मानाबाद, लातुर
जिल्हा मत्स्यव्यवसाय विकास अधिकारी, औरंगाबाद, जालना, बीड, परभणी, हिंगोली, नांदेड, उस्मानाबाद, लातुर
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) / (लेखा परिक्षा), महाराष्ट्र-२ नागपूर
जिल्हा कोषागार अधिकारी, औरंगाबाद, जालना, बीड, परभणी, हिंगोली, नांदेड, उस्मानाबाद, लातुर
नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२
निवड नस्ती.